प्रकरण १ ले

# ''भटक्या जाती व जमाती''

# प्र क र ण (1) ले

## भटक्या जाती व जमाती

### अ) गांवगाडा ...

भारतातील ग्रामसंस्था म्हणजेच ' गांवगाडा ' फार प्राचीन आहे. या संस्थेची निर्मिती मानवी गरजांतून झाली. तसेच समाजातील गटांमधील अर्थसंबंध व परस्पर आश्रयाचे संबंध यावरच ती आधारित असलेली दिसून येते. परंतु अनेक शतके गांवगाड्याच्या आश्रयाने जगत असूनही कांही जमाती व जाती भटक्याचे जीवन जगत आहेत. त्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. ग्रामसंस्थेतील बलुतेदारी पध्दती व जातीव्यवस्था यांच्या घट्ट पकडीमुळे अशी समाजव्यवस्था निर्माण झाली की या समाजव्यवस्थेत भटक्या जाती, जमाती शिरकांव करू शकल्या नाहीत.

### आ) भटक्यांची व्युत्पत्ती ...

उदरनिर्वाहाकरिता निवडलेल्या अगर वाटयास आलेल्या व्यवसायानिमित्त अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणा-या लोकांना ' भटके ' म्हणतात.(1) इंग्रजीत त्यांचा उल्लेख ' नोमॅडस् ' असा करतात. ' नोमॅड ' हा शब्द ' नोमी ' किंवा ' नेमो' (गुरे चारणे) या ग्रीक शब्दापासून तयार झालेला आहे.(2). स्वतःचे कायम स्वरूपाचे घर अथवा शेतजमीन नाही, परंतु गुरांचे कळप आहेत. असे लोक गुरांसाठी चराऊ रानांच्या, कुरणांच्या शोधार्थ सतत भटकत असतात. अशा लोकांना उद्देशून ' नोमॅड ' हा शब्द वापरला जातो.

'Nomad' - One who leads a wandering or pastoral life, one of a tribe that wanders about in quest of game or of pasture & has no fixed habitation'(3).
'The Pocket Oxford Dictionary' मध्ये ...

'Nomad' - member of tribe roaming from place to place for pasture; wanderer' असा उल्लेख आढळतो. (4)

हा शब्द किंवा संकल्पना फक्त जंगलांत भटकणा-या लोकांसाठी न वापरता एकाच ठिकाणी कायमचे वास्तव्य न करता सतत भटकंती करणा-या लोकांसाठी ही वापरली जाते. खेचरे, गाढवे, तट्टू, घोडे, उंट इत्यादिंवर आपली मालमत्ता लादून स्वतःच्या इच्छेनुसार किंवा परिस्थितीच्या दडपणामुळे चांगली उपजीविका होऊ शकेल अशा ठिकाणांच्या शोधात असे लोक सतत स्थलांतर करीत रहातात. डोंबा-याचे खेळ, जादूचे खेळ, भविष्य कथन, किरकोळ व्यापार, कारागिरी, वैद्यकी इत्यादि व्यवसाय ते करतात.सतत भटकणा-या समूहांव्यतिरिक्त कांही समूह हे अर्ध-भटके

जीवन जगतात. अशा समूहांजवळ स्वतःचे घर किंवा थोडीफार शेत जमीन असते आणि शेतीचा हंगाम संपल्यानंतर जेथे उदरनिर्वाहाकरिता लागवडीला योग्य जमीन उपलब्ध असेल तेथे कुटुंबियांसह आणि सामानासह ते स्थलांतर करतात. हंगाम संपल्यानंतर ते आपल्या मूळ ठिकाणी येतात.

अमेरिका आणि युरोप खंडात असे भटके जीवन जगणा-या जमातींना ' जिप्सी ' म्हणतात.(5) ' जिप्सी ' हा शब्द इजिप्शियन हया शब्दाचा अपभ्रंश आहे असे कांही तज्ञांचे मत आहे. जिप्सी हे भारतातूनच आले असावेत असेही तज्ञांचे मत आहे. भारतातून दोन हजार वर्षापूर्वी त्यांनी युरोप - अमेरिकेकडील देशात स्थलांतर केले असे म्हटले जाते. जुलमी आक्रमणाला शरण न जाता आपले अस्तित्व टिकविण्यासाठी आणि स्वाभिमानाला उणेपणा येऊ नये, यासाठी जिप्सींना स्थलांतर करावे लागले.

इ ) <u>भटक्यांच्या विकसित अवस्था</u> . . .

' अन्नशोधक भटके ' ही भटक्यांची प्राथमिक अवस्था होती.(6) नैसर्गिक साधनसंपत्तीवर ( कंदमुळे, फळे व मासे ) ते आपला उदरनिर्वाह करीत. पाषाण युगात मानवाला दगडी हत्यारे तयार करता येऊ लागली. त्यांचा उपयोग ते स्वरक्षणासाठी आणि प्रतिहल्ल्यासाठी करू लागले. धातुच्या आणि लाकडाच्या लवचिकपणाचा शोध लागल्यानंतर धनुष्यबाण, परशुसारखी कांही हत्यारे त्यांना करता येऊ लागली. या हत्यारांच्या सहाय्याने त्यांना शिकार करता येऊ लागली. शिकार केलेल्या प्राण्यांच्या मांसांचा त्यांनी अन्नात समावेश केला. ' शिकारी भटके ' ही त्यांची अन्नशोधक भटक्यानंतरची अवस्था होय.(7)

हळूहळू त्यांना गाई म्हशींपासून मिळणारे दूध, शेळया मेंढयापासून मिळणारी लोकर, घोडे, उंट इत्यादिंचा दुर्गम प्रदेशात प्रवासास आणि त्यानंतर हल्ला करण्यासाठी होणारा उपयोग कळू लागला. प्राणीसृष्टीस आपल्या सेवेत जुंपण्यास त्यांनी सुरुवात केली. पशुपालनांपासून त्यांना फायदे मिळू लागले. पशूंचे संगोपन करणारे भटके हे ' चारण भटके ' म्हणून ओळखले जाऊ लागले.(8) पशूंचा कळप बाळगून चारण भटके पृथ्वीवरील सुपिक कुरणांचा शोध घेत भटकत होते. त्याच्या जवळील पशूंचे रुपांतर पशुधनात झाले. पशुंचा क्रय विक्रय होऊ लागला. पशूंचा क्रय विक्रय करणारे भटके ' व्यापारी भटके ' म्हणूनही ओळखू लागले.(9)

शेतीच्या शोधानंतर त्यांनी बैल, रेडे यासारख्या प्राण्यांना शेतीस जुंपले. शेतीमुळे त्यांच्या जीवनांत थोडे फार स्थैर्य आले. तसेच गुरे आणि मेंढया यांपासून मिळणा-या लोकर, हाडे, कातडी, दूध यावर ते आपला निर्वाह करू लागले. अशा प्रकारचे भटके हे ' उत्पादक भटके ' म्हणून ओळखले जाऊ लागले.(10) आपल्या व्यवसायाद्वारा लोकांना सेवा उपलब्ध करून देणारे

.3.

आणि त्यांची करमणूक करणारे भटके हे अनुक्रमे ' सेवाकर्म करणारे भटके ' आणि ' करमणूक करणारे भटके ' म्हणून ओळखले जाऊ लागले.[11]

ई) **भटक्यांचे वर्गीकरण** ...

* **व्यवसायानुसार भटक्यांचे वर्गीकरण** ...

क) उत्पादक काम करणारे.

ख) सेवाकर्म करणारे.

ग) करमणूक करणारे[12].

क) **उत्पादक काम करणारे भटके** ... हे भटके गुरे आणि गुरांपासून मिळणारी उत्पादके ( लोकर, हाडे, कातडी इ. ) तसेच गुरांची विक्री, त्यांची देवाण घेवाण यावर आपली गुजराण करतात. कळपातील गुरांच्या गरजांशी त्यांचे भटकेपण निगडीत असते. गुरांना चरण्यासाठी आवश्यक असलेल्या कुरणांच्या शोधात ते भटकतात. एका कुरणातील गवत संपले की, दुस-या कुरणाकडे ते वाटचाल करतात. हे भटके भारतात हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तरप्रदेश या राज्यातील भरपूर कुरणांच्या प्रदेशात आढळून येतात. चांगपास आणि बाकरवाल ही त्यांची ठळक उदाहरणे होत. गुरांच्या कळपापासून मिळणा-या उत्पन्नास पूरक उत्पन्न शिकार, मासेमारी, औषधी वनस्पती आणि कंदमुळे गोळा करणे यापासून मिळते.

ख) **सेवाकर्म करणारे भटके** ... हे भटके धान्य, मीठ आणि इतर वस्तू ज्या ठिकाणी स्वस्त उपलब्ध असतील तेथून खरेदी करतात आणि ज्याठिकाणी त्या वस्तु दुर्मिळ असतील तेथे थोडाफार नफा घेऊन विकतात. तसेच दोर, चटया तयार करणे, विकणे, औषध विकणे, लोहार काम करणे, मोलमजुरी करणे, चाकू, सुरी, कात्री यांना धार लावणे इ. कामेही ते करतात. अशा प्रकारचे भटके हे भारतात बंजारा, लमाण, बेलदार, गाडुला, घिसाडी लोहार, शिकलगार म्हणून परिचित आहेत.

ग) **करमणुक करणारे भटके** ... कर्नाटकातील बुडबुडीकी, गोंधळी, आणि जोशी घरोघरी जाऊन भविष्यकथन व मदारी सर्पांचा खेळ, डोंबारी तारेवरची कसरत, नंदीवाले बैलांचा खेळ आणि काही जादूचे प्रयोग करतात. या मार्गांनी लोकांची करमणुक करणारे भटके उत्पादक व सेवाकर्म करणा-या भटक्यांहून भिन्न असून त्यापैकी नॅटस काळबेलिया, आणि जोगी हे सर्पांचा खेळ करून पोट भरणारे आहेत. अशा लोकांना पूर्वी गावोगावी अन्नधान्य, जुने कपडे इ. मोबदला म्हणून मिळत असे.

* **' बेकन ' यांनी 1954 साली केलेले वर्गीकरण**[13]

  क) भटके

  ख) अर्धभटके

क) भटके ... या जाती सदैव भटकत असतात.

ख) अर्धभटके ... या जाती कुठेतरी स्थायी जीवन जगतात व महिन्यातून काही काळ त्या भटकत असतात.

* **' एनसायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस** ... यामध्ये भटक्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आढळते.

  क) शिकारी व संग्राहक भटके

  ख) पशुपालक जाती

  ग) कृषी जीवनाधिष्ठित भटक्या जाती[14]

* **' राघवय्या ' यांचे वर्गीकरण** ... भारतातील विमुक्त भटक्या जाती जमातीच्या अभ्यासाचे उद्घाते ' राघवय्या ' यांनी पुढीलप्रमाणे त्यांचे वर्गीकरण केलेले आढळते.[15]

  क) परंपरेने भटक्यांचे जीवन जगणा-या जमाती.

  ख) पशुपालक जमाती.

  ग) मोसमी भटके.

  घ) गुन्हेगारांच्या भटक्या जमाती.

  च) व्यावसायिक भटके.

  छ) भिक्षुक भटके.

* **' नरेंद्र गोपाळ राव ' यांचे वर्गीकरण** .. नरेंद्र गोपाळ राव यांनी 25 फेब्रुवारी रोजी 'Nomadic Tribes Day' या दिवशी प्रकाशित केलेल्या स्मरणिकेत जो लेख लिहिला आहे त्यांत भटक्या जातीची पुढीलप्रमाणे व्याख्या केली आहे.[16]

The term nomadic groups should be applied to those cultured or ethnic groups or large segments there of who are traditionally nomadic and bound to nomadism by their economic pattern rooted in their culture.

नरेंन्द्र राव यांनी भटक्या जातीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे केले आहे.

क) पोट भरण्यासाठी ज्यांना भटकंती करावी लागते/अन्न मिळविण्यासाठी ज्यांना भटकावे लागते अशा जाती.

ख) पशुपालक जमाती/व्यवसाय शोधासाठी भटकणा-या जाती.

ग) व्यावसायिक भटके, रंजन करणारे, गुन्हेगार आणि स्थलांतरित भटके.

* भटक्या जमातीची वर्गीकरणे ही पुढील गोष्टींच्या आधारावर केलेली आढळतात.[17]

अ) फिरस्तीचा प्रकार

ब) आर्थिक जीवन

क) समाज शास्त्रीय तत्वे

यानुसार भटक्यांचे पुढील वर्गीकरण आढळते...

क) अर्ध भटके

ख) पशुपालक भटके

ग) व्यावसायिक भटके

घ) समाजोपयोगी काही सेवा करणा-या भटक्या जमाती

च) इतर भटक्या जमाती.

उ) **भटक्या जमातींवर हिंदु धर्माचा प्रभाव** ... भारतातील भटक्या जमाती हिंदु धर्माचे अनुकरण करताना दिसून येतात. व्यवसायानिमित्त भटकत असताना स्थानिक हिंदु धर्मियांशी या भटक्यांचा सतत संपर्क येत राहिल्यामुळे कळत नकळत त्यांच्याकडून हिंदु संस्कार अंगीकारले गेले असावेत.[18] हिंदु धर्मियांतील पाप पुण्य या संकल्पनांवर त्यांचा विश्वास दिसून येतो. लग्नविधीही हिंदु धर्मियांप्रमाणेच कमी अधिक प्रमाणांत असतात. राजा व राज्यसत्ता यांनी अंगिकारलेल्या धर्माचा प्रभावही काही भटक्या जमातीवर झालेला दिसून येतो. उदा. काश्मिर आणि हिमाचल प्रदेशातील गुज्जर सारख्या काही भटक्या जमातींनी इस्लाम धर्म स्वीकारला.[19]

ऊ) **भटक्यांतील कुटुंब व विवाह पध्दती** ... भारतातील भटक्या जमातींमध्ये मुख्यत्वे पितृसत्ताक कुटुंब पध्दती असून एक पत्नीत्वाची प्रथा रूढ आहे. परंतु पहिली पत्नी दीर्घकाळ आजारी असेल, तिला वंध्यत्व आले असेल, किंवा तसेच कांही महत्वाचे कारण असेल, तर दुसरी पत्नी करण्याची त्यांना मुभा आहे. भटक्यांतील मुसलमान एकापेक्षा अधिक बायका करतात. परंतु एकच पत्नी

करण्याकडे प्राय: सर्व भटक्यांचा कल दिसून येतो. मुसलमान भटके वगळता इतर भटक्यांमध्ये हिंदु विवाह पध्दती रूढ आहे.[20] पण गांधर्व विवाह व वधुवरांच्या इच्छेनुसार जोडीदाराची निवड करता येत नाही. विधवा विवाह, घटस्फोट आणि विभक्त कुटंब पध्दती या गोष्टींनाही कांही भटक्या जमातींत परवानगी दिली जात नाही.

ए) <u>भारतातील पारंपारिक सामाजिक - आर्थिक व्यवहारांत भटक्यांचे स्थान</u> ...

भारतातील पारंपारिक सामाजिक - आर्थिक व्यवहारात भटक्यांचे स्थान नगण्य आहे. प्राचीन काळी वस्तूंचे किंवा सेवांचे मूल्य हे प्रामुख्याने पैशाच्या स्वरूपात न ठरवता धान्याच्या रुपात ठरवले जात होते. वस्तु आणि सेवा यांच्या परस्पर विनिमयाच्या स्वरूपात व्यवहार पार पाडले जात.[21] भटक्या जमातींचा त्यांच्या व्यवसायानिमित्तच गावक-यांशी संपर्क येई. हा संपर्क स्थायी स्वरूपाचा नव्हता. गावगाडयातील आर्थिक व्यवहारातही भटक्या जमातींना महत्वाचे स्थान लाभले नाही.

ऐ) <u>आधुनिकीकरण व औद्योगिकरण यांचा भटक्या जमातींवरील परिणाम</u> ...

आधुनिकीकरणामुळे भारताच्या पारंपारिक समाजजीवनावर जसा परिणाम झाला तसा भटक्या जमातींवरही झालेला दिसून येतो. औद्योगिकरणासाठी जंगलतोड करून जागा उपलब्ध करून देण्यात आली. जंगल तोडीमुळे गवताची कुरणे नष्ट होण्याच्या मार्गावर लागली. जळणासाठीही जंगलतोड होऊ लागली. याचा परिणाम जंगले ओसाड झाली. याचा दूरगामी परिणाम भटक्यांच्या व्यवसायावर झाला. गुरांना चरण्यासाठी कुरणे अपुरी पडू लागली. त्यामुळे गुरांचे कळप बाळगणे कठीण होऊ लागले. त्यामुळे गुरांपासून मिळणारी उत्पादने कमी झाली. जंगलात लागवडीखाली असणा-या जमिनीबाबत बंधने आली. म्हणून भटक्यांना जमिनी कसणे अशक्य झाले. याचा परिणाम म्हणजे भटके व्यवसायहीन बनले. मोलमजुरी करू लागले. टाकाऊ उद्योग करू लागले. तर काही भीक मागून पोट भरू लागले.

आधुनिकीकरणाचा भटक्यांच्या आचार - विचारांवर फारसा परिणाम झालेला दिसून येत नाही. पण अलिप्तपणामुळे त्या मागास बनल्या. यातून काही जमाती गुन्हेगार बनल्या व पुढे गुन्हेगार म्हणूनच ओळखल्या जाऊ लागल्या.[22]

ओ) <u>विमुक्त जमाती</u> ... परिस्थितीचा दबाव आणि आर्थिक विपन्नता यामुळे कित्येक जमाती गुन्हेगारीकडे वळून जन्मजात गुन्हेगार बनल्या. पिढयानुपिढया गुन्हे करणे हाच त्यांचा व्यवसाय बनला. प्रत्येक पिढीत लहान मुलांना गुन्हे करण्याचे प्रशिक्षण - व्यवसाय म्हणून कुटुंबामध्येच

दिले जात असे. अशारितीने गुन्हेगारी वातावरणातील समाजीकरण नव्या पिढीस गुन्हेगार बनवू लागले.

* **गुन्हयांचे विशिष्ट प्रकार** ... गुन्हेगार जमातीतील विशिष्ट जमाती विशिष्ट प्रकारचे गुन्हे करीत. उदा. पूर्वीच्या मध्य प्रांतातील ( विद्यमान महाराष्ट्रांतील भंडारा, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर जिल्हे आणि मध्य प्रदेशातील महाकोशल सारखे भाग ) गोपाळ, आणि मारवाडी, कंजार या जमाती फक्त गुरांचीच चोरी करत असत. कोरवा जमातीत घरफोडी आणि चोरी करणे भ्याडपणाचे कृत्य मानतात.(23) गुन्हे केव्हां आणि कोठे करावयाचे याचे संकेत असत. पंजाबमधील टॅगू हे रात्रीच्या वेळी गुन्हे करीत नसत. भामटे ज्या खेडयात रहात तेथे चोरी करीत नसत. पूर्वीच्या संयुक्त प्रांतातील ( विद्यमान उत्तर प्रदेशातील ) सानोरहिया हे आपल्या घराजवळ कधीही चोरी करीत नसत. वर्तुणुकीचे नियम आणि नैतिकता ते काटेकोरपणे पाळीत असत.

गुन्हेगार जमाती या दूर जंगलात वास्तव्य करतात. त्यांच्याजवळ उपजीविकेची साधने नव्हती म्हणून गांवगाडयात त्यांना स्थान मिळाले नाही. अपवाद लमाण, बंजारा, वडार इ. जमाती.(24)

* **1871 सालचा क्रिमिनल ट्राईब्ज ॲक्ट** ... मोगल सत्तेच्या अखेरच्या काळांत आणि इंग्रजी सत्तेच्या सुरुवातीस भारतात एक छत्री अंमल नव्हता. इंग्रज लोक राज्य व व्यापार उदीम वाढविण्यासाठी प्रयत्न करीत होते. एतद्देशीय राजे आपापसांत व नंतर इंग्रजाशी लढण्यात गुंतले गेले. याचा परिणाम प्रशासन अकार्यक्षम बनले व उत्तर भारतात ठग आणि दरोडेखोर लोकांना लुबाडू लागले. खेडयांना स्वतःचे संरक्षण स्वतःच करावे लागले. यासाठी इंग्रजांनी 1871 साली क्रिमिनल ॲक्ट पास केला.(25) भारतात सर्व कर्मे जातकर्म म्हणून केली जातात. यानुसार गुन्हेगार पूर्वजांचे वंशजही गुन्हेगारच असणार या अनैसर्गिक व अशास्त्रीय आधारावर हा कायदा केला. या कायद्यानुसार भटक्या लोकांच्या काही समूहाना गुन्हेगार ठरवून त्यांच्यावर कडक निर्बंध लादले व बंद वस्तीमध्ये त्यांना अडकवून ठेवले गेले.

स्वतंत्र भारतामध्ये हा कायदा मागे घेण्यात आला. गुन्हेगार जमातींना ' विमुक्त जमाती ' असे नांव देण्यात आले. पुढील जमाती ' विमुक्त जाती ' म्हणून घोषित केल्या गेल्या.(26)

क. राजस्थान ... वातरिया, मीना, ढेया, सिंगिकाट, कंजारभाट.

ख. उत्तरप्रदेश ... बावरिया, मीना डोय.

ग. आंध्र प्रदेश ... येनाडी, कट्टेरा, डोंगदिशारी, पेड्डातीगोल्ला, कट्टिपापालु, निराशिकारी, पामुला, डोमारा, मांडुला, कोरवा, एरूकला.

घ. दिल्ली व हरयाना...सानसीया.

च. महाराष्ट्र ... गोंधळी, जोशी, मराडी, चित्रकथी, वासुदेव, नंदीवाले, तिरमाळ, बेरड, रामोशी, पारधी, वडार इ.

छ. गुजराथ ... वाघरी.

ज. बिहार व उत्तरप्रदेश... करवाल, गुलगुली.

झ. राजस्थान, जम्मू काश्मिर ... सिगिकाट व ढेया.

ट. बंगाल ... जोगी

ठ.तमिळनाडू ... आदिपंतारम्.

ड.भारतात सर्वत्र आढळणारी ... बंजारा जमात.

## महाराष्ट्रातील भटक्या जाती आणि जमाती

महाराष्ट्रांत एकूण 42 भटक्या - विमुक्त जमाती आहेत. त्यापैकी 28 भटक्या व 14 विमुक्त आहेत.(27) या 42 जमातींच्या पोटजातींची संख्या 200 पर्यंत आहे. त्यामध्ये संस्कृतीने, रुढी परंपरेने, भाषेने, व्यवसायाने, औद्योगिक कारणाने आणि स्वतःहून वेगळेपण स्वीकारलेले असे भटक्यांचे समूह दिसून येतात.

## महाराष्ट्रातील फिरस्त्या जमातीचे वर्गीकरण ...

(अ) महाराष्ट्रातील फिरस्त्या जातींचे वर्गीकरण स्थूलमानाने पुढीलप्रमाणे करता येते(28).

क. शिकारी जमाती ... फासेपारधी, शिकलगार, वैदू.

ख. पशुपालक जमाती ... गोपाळ, गोल्ला, मैराळ, दांगट इ.

ग. रंजन करणा-या जमाती ... चित्रथी, कोलाटी, सापगारूडी, मदारी, सय्यद हळदीवाले, मांगगारूडी इ.

घ. भविष्य सांगणा-या आणि भिक्षुक जमाती ... तिरमाळी, मेढंगी, कुडमुडे जोशी, ठोके जोशी, डमरूवाले, सरोदे, काशीकापडी, वासुदेव इ.

च. निरनिराळे व्यवसाय करणारे ... कैकाडी, वड्डर, बंजारा, बेलदार इ.

छ. देवतेला नवस म्हणून वाहिलेल्यांमधून निर्माण झालेल्या आणि भगतांच्या जाती: गोंधळी, वाघे, आराधी, जोगनी इ.

( कांही वर्षापासून या जाती स्थायिक व वतनदार झाल्या आहेत. परंतु उपजीविका व देवतांचे विधी, उत्सव करण्यासाठी त्यांना सतत भटकावे लागते )

ज. पंथीय मागते ... दसनामी, नामजोगी, नाथगोसावी, लवंगी गोसावी.

झ. जातमागते ... डक्कलवार, रायरंद इ..

ट. अपंग, तीर्थयात्रा करणारे ... हिजडे, जान्या इ.

(आ) महाराष्ट्र शासनाने विमुक्त भटक्या जातींची जी यादी प्रसिध्द केली आहे त्यात पुढील जातींचा अंतर्भाव आहे.(29)

| विमुक्त जाती | | तत्सम |
|---|---|---|
| ए. बेरड | .. | ए.अ) वगळले |
| | | ब) नाईकवाडी |
| | | क) तलवार |
| | | ड) वाल्मिकी |
| बी. वेस्तर | .. | बी. संचल्लु वड्डर |
| सी. भामटा | .. | सी.अ) भामटी |
| | | ब) गिरणी वड्डर |
| | | क) कामारी |
| | | ड) पाथरुट |
| | | इ) टकारी |
| | | फ) उचले |
| डी. कैकाडी | .. | डी.अ) घोंतले |
| (मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, | | ब) कोरवा |
| जळगांव, पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, | | क) माकडवाले/कोंचीकोरवा |
| कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, परभरणी, | | ड) पामलोट |
| उस्मानाबाद, नांदेड, जिल्हे व चंद्रपूर | | इ) कोरवी |
| जिल्हयातील राजुरा ( तालुका यत ) | | |

10 UNIVERSITY KOLHAPUR

**वर्गीकरण**

| विमुक्त जाती | .. | तत्सम |
|---|---|---|
| इ. कंजारभाट | .. | इ.अ) छरा |
| | | ब) कंजार |
| | | क) नात |
| एफ. कटाबू | | |
| जी. बंजारा | .. | जी.अ) गोर बंजारा |
| (शा.पा.शि.व स.क.वि.क्र. | | ब) लंबाडा/लंबारा |
| सीबीसी-1464/146691-म दिनांक | | क) लंमाणी |
| 18 फेब्रुवारी 1965 ) | | ड) चरण बंजारा |
| | | इ) लमाण |
| | | फ) मथुरा लमाण |
| | | ग) कंचकीवाले बंजारा |
| | | ह) लमाण बंजारा |
| | | ज) लबान |
| | | क) वगळण्यात आले |
| | | ल) धारवे/धालीया |
| | | म) धाडी / धारी |
| | | न) सिंगारी |
| | | व) नावी बंजारा |
| | | प) जोगी बंजारा |
| | | क्यू) वगळण्यात आले |
| | | स) बंजारी (शा.प.क्र. सीबीसी 1477/35512-का-5 दि.18/8/1977) |
| एच्. वगळले | .. | एच्. पाल पारधी |
| आय. राजपारधी | .. | आय.अ) वगळले |
| | | ब) गाव पारधी |
| | | क) हरण शिकारी |
| | | ड) वगळले |

.11.

**वर्गीकरण**

| विमुक्त जाती | | तत्सम |
|---|---|---|
| जे. राजपूत भामटा | .. | जे.अ) परदेशी भामटा<br>ब) परदेशी भामटी |
| के. रामोशी | .. | के. |
| एल्. वडार | .. | एल्.अ) गाडी वडार<br>ब) जाती वडार<br>क) माती वडार<br>ड) पाथरवट |
| एम्. वाघरी | .. | एम्.अ) सलात<br>ब) सलात वाघरी |

एन्. छप्परबंद ( मुस्लीम धर्मीयासह ) .. शा.नि.समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. सीबीसी 1477/58463/का-5 दिनांक 20/3/78

**भटक्या जमाती** ...

| जाती | | तत्सम |
|---|---|---|
| ए. गोसावी | .. | ए.अ. बाबा, ब. बैरागी, क. भारती, ड.गिरी गोसावी इ. भारती गोसावी ई.सरस्वती पर्वत, उ. सागर, ऊ. बान किंवा वान, ए. तीर्थआश्रम ऐ. अरण्य घरभारी ओ. सन्यासी, औ. नाथपंथी गोसावी |
| बी. बेल्दार | .. | बी. ओड |
| सी. भराडी | .. | सी.अ) बाळ संतोशी<br>ब) किंगरीवाले<br>क) नाथबाबा<br>ड) नाथजोशी<br>इ) नाथपंथी डवरी गोसावी |

**वर्गीकरण**


| विमुक्त जाती | .. | तत्सम |
|---|---|---|
| डी. भुते | .. | डी. भोपे |
| इ. वगळले | .. | इ. |
| एफ. चित्रकथी | .. | एफ. |
| जी. गारूडी | .. | जी. |
| एच. घिसाडी | .. | एच. घिसाडी, लोहार किंवा गाडी लोहार किंवा चितोडी लोहार, राजपूत लोहार. (शा.प.शि.क्री.व स.क.वि. क्र.सीबीसी.1470/10269/ज दिनांक 14/8/1970) |
| आय. गोल्ला (शा.नि.स.क.सां.का.क्री.व प.वि.क्र. सीबीसी.1478/41079/का.5 दिनांक 29/11/78 अन्वये सोलापूर व सांगली जिल्हयात हे शद्व वगळले आहेत) | .. | आय. गोल्लेवार गोलेर (शा.नि.स.क.सां.का.क्री.व प.वि.क्र.सीबीसी.1479/66/ का.5 दि.12/7/79 गोलकर (शा.नि.सीबीसी.1479/66/5 दिनांक 4/9/79) |
| जे. गोंधळी | .. | जे. |
| के. गोपाळ | .. | के. गोपाळ भोरपी (शा.प.शि.व स.क्र.वि.क्र. सीबीसी 1464/93343/3 दिनांक 13/8/1965) |
| एल. हेळवे | .. | एल. खोळकरी हिलव |
| एम. जोशी | .. | एम.अ) बुडबुडकी<br>ब) डमरूवाले<br>क) कुडमुडे<br>ड) मेंढगी<br>इ) सरोदे |

| विमुक्त जाती | .. | तत्सम |
|---|---|---|
| | | फ) सहदेव जोशी |
| | | ग) सरवेद |
| | | ह) सरोदा |
| एन. काशी कापडी | .. | एन. |
| ओ. कोल्हाटी | .. | ओ. डोंबारी |
| पी. मैराळ | .. | पी.अ) दांगट |
| | | ब) बोर |
| क्यू. मसणजोशी | .. | क्यू.अ) सुदगडसिध्द |
| | | ब) मपनजोगी |
| आर. नंदीवाले | .. | आर. तिरमल |
| एस. पांगूळ | .. | एस. |
| टी. रावळ | .. | टी. रावळयोगी (शा.नि.शि.व स.क.वि.क्र. 1465/151005 म दिनांक 21/5/1966) |
| यू. सिक्कलगर | .. | यू. कटारी |
| व्ही. ठाकर (फक्त रत्नागिरी जिल्हयात ) | | व्ही. |
| डब्ल्यू. वैदू | .. | डब्ल्यू. वगळण्यात आले |
| एक्स. वासुदेव | .. | एक्स. |
| वाय. भोई | .. | वाय.क) झिंगा भोई |
| (शा.नि.स.व सां.का.क्री.व वि.क्र.सीबीसी 1073/10615/ज.1 दि.25/5/1974, शा. शुध्दिपत्र समक्रमांक दिनांक 7 जून 1974) | | ख) परदेशी भोई |
| | | ग) राजभोई |
| | | घ) भोई |
| | | च) कहार |
| | | छ) गोंडिया कहार |
| | | ज) धुरिया कहार |
| | | झ) किरात |



SHIVAJI UNIVERSITY * KOLHAPUR

नकाशा क्र० ५




वैदूंची जमातीची गांवे

| विमुक्त जाती | | तत्सम |
|---|---|---|
| | | ट) मछुवा |
| | | ठ) गाझी |
| | | ड) जातिया |
| | | ढ) केवट |
| | | ण) ढोवर |
| | | त) धोवर |
| | | थ) धोमर |
| | | द) पालेवार |
| | | ध) मेछंद्र |
| | | न) नावाडी |
| | | प) मल्हार |
| | | फ) मल्हाव |
| | | ब) भोई |
| | | भ) गाढव भोई |
| | | य) खाडी भोई |
| | | व) खारे भोई |
| | | श) ढेवरा |
| | | (शा.नि.स.क.सां.का.क्री.त प.वि.क्र.सीबीसी.1073/10615/ज.1 दिनांक 14 ऑक्टोबर 1974 ) |
| झेड. बहुरूपी | .. | झेड. |
| एए. ठेलारी (धुळे, नाशिक, जळगांव, व औरंगाबाद जिल्हयात ) | | एए. |
| बीबी. ओतारी | .. | बीबी.अ) ओतनकर |
| | | ब) ओतवार |

वर्गीकरण

विमुक्त जाती .. तत्सम

क) वतारी

ड) ओझारी

(शा.नि.स.क.सां.का.क्री व प.वि. क्र.सीबीसी.1477/40950/का 5 दि.13/12/77

शासनाच्या वरील यादीत मागासवर्गीयांपैकी ज्या जाती भटक्यांचे जीवन जगतात त्यांची नोंद नाही.. उदा. मांगांचे मागते डक्कलवार या जमातीचा, मांग गारुडी या जातींचा उल्लेख अनुसूचित जातीत केला आहे. रायरंद या भटक्यांच्या तीन जाती - उदा. महार रायरंद, मराठा रायरंद (बहुरूपी), मुस्लीम रायरंद या जमाती भटक्या आहेत. पारधी, फासेपारधी, लंगोटी पारधी, राजपूत भामटा या जातींना भटक्यांच्या यादीत समाविष्ट केले पाहिजे. काही जातीचे लोक आपला समावेश भटक्या जातीत व्हावा म्हणून प्रयत्न करीत आहेत. बेलदार ही भटकी जात म्हणून जाहीर झाली आहे. कुमावत लोक यासाठी प्रयत्नशील आहेत. क्षत्रिय कुमावत, भाट, ठाकूर लोक ही भटक्यांच्या यादीत अंतर्भाव व्हावा म्हणून प्रयत्न करीत आहेत.

( इ ) महाराष्ट्रांतील भटक्यांचे व्यवसाय(30)

महाराष्ट्रांतील भटक्यांचे व्यवसाय पुढीलप्रमाणे आढळतात.

क. शिकार करणे ख. जनावरे पाळणे ग. पारंपारिक कलेच्या आधारे मनोरंजन करणे घ. हस्तरेषा .. भविष्य सांगणे च. देवाच्या नांवावर भिक्षुकी करणे छ. घरांघरी भिक्षा मागणे ज. धार्मिक विधी .. कार्य करणे झ. कष्टाची कामे करणे.

( ई ) महाराष्ट्रांतील भटक्या विमुक्तांचे सण(31)


क. नागपंचमी ख. महाशिवरात्री ग. दसरा घ. नवरात्र उत्सव च. आषाढी छ. खंडोबाची जत्रा ज. कान्होबाची जत्रा झ. पितृपंधरवडा ट. महादेवाची यात्रा ठ. रंगपंचमी ड. चैत्रमास ढ. चंपाषष्ठी ण. देवदेवतांचे उत्सव त. रमजान (ईद).

( उ ) भटक्या विमुक्तांच्या जातीपंचायतींची बैठकीची गांवे(32)

क. मढी (अहमदनगर) ख. माळेगांव ग. जेजुरी घ. सोनारी च. बार्शी छ.आळंदी ज. चिखली झ. अन्नाड ट. रजापूर ठ. अडूळ ड. लासुरे ढ. बारामती ण. चाळीसगाव त. पाथर्डी (अहमदनगर) थ. नारायणगांव द. शिगोळा ध. कुंभारी न.बीड प. खार्डा फ. देऊळगांव राजा ब. पारंडा भ. करमाळा.

UNIVERSITY ... PUR

नकाशा क्र. १




भटक्या विमुक्तांच्या जातीपंचायतींची गांवे

( ऊ ) भटक्या जमातींची दैवते[33]

| | |
|---|---|
| क. गोसावी | धारदेवी, राजमोगल देवी, सातदेवी, अंबिका, लक्ष्मी, सितलादेवी. |
| ख. लवंगी गोसावी | मरिआई, खंडोबा, लक्ष्मीआई, अंबाबाई, पीर |
| ग. नाथपंथी डवरी | काळा भैरवनाथ ( गुरूगादी सोनारी, परांडा) गोसावी |
| घ. बेलदार | भवानीमाता, कानिफनाथ, खंडोबा |
| च. घिसाडी | जोतिबा, अंबाबाई, लक्ष्मीआई, भैरोबा, खंडोबा. |
| छ. गाडीलोहार | एकलिंगजी / शंकर |
| ज. भराडी गोंधळी | चतुशृंगी, मानकेश्वरची सटवाई, औंधचा म्हसोबा, तुळजापूरची भवानी, तिरुपती, बालाजी. |
| झ. गोपाळ | खंडोबा, सखालादी बाबा, पीर, जोतिबा |
| ट. कुडमुडे जोशी | पीर, पैगंबर, मरिआई ( हिंदु व मुस्लीम दोन्ही धर्माचे रिवाज पाळतात, ताबूत बसवतात, मोहरमध्ये उपास करतात, पंजे बसवितात) |
| ठ. मेढंगी | कान्होबा, भैरोबा, मारूती, मुंजाबा, खंडेराया, मरिआई |
| ड. काशी कापडी | कंदलवार ( धार्मिक गुरू दैवत) तिरुपती, बालाजी |
| ढ. कोल्हाटी | खंडोबा, भैरोबा, कान्होबा, तुळजापूरची देवी |
| ण. डोंबारी | कान्होबा, मरिआई |
| त. ढवळा नंदीवाला | महाकाली, म्हासोबा नाथ, बाबा धावजीबाबा, मौनीनाथ, शंकर, अंबा भवानी, दुर्गामाता, बालाजी |
| थ. रावळ | शंकर, नवनाथांचे अवतार |
| द. सिक्कलगार | सितलादेवी, माता मसानी (गुरू गोविंदसिंह गुरू नानक धार्मिक गुरू दैवत ) |
| ध. वैदू | शंकर, हनुमान, फिरस्तीमाता, म्हैसामदेवी,फिलोर(स्वामी) |
| न. परदेशी भोई | दुर्गादेवी, महाकाली |
| प. बहुरूपी | शंकर, खंडोबा |
| फ. ओतारी | महालक्ष्मी, शिव पार्वती |
| ब. रमय्या | (शीखधर्मीय) गुरुनानक (धर्मगुरू) |

.17.

| | |
|---|---|
| भ. मारवाडी भाटी | खोडियार माता, जय सामुंडा, महाकाली, जयभवानी, जगत की जोगनी, महावीर, काळाभैरव, गोरा भैरव |
| म. मदारी | अल्ला, पीर, कानिफनाथ |
| य. सपेरेनाथ | कृष्ण, गंगा, बजरंग बाबा, सितलामाता, कालीमाता, चंडकीमाता, नरदमाता, भैरू महाराज |
| र. मरिआईवाला | मरिआई, लक्ष्मीआई, तुळजाभवानी, काळूबाई, खंडोबा मानकेश्वरची आई |
| ल. रायरंद | लक्ष्मीआई |
| व. वाघ्यामुरळी | खंडोबा |
| श. राजगौड | (आदिवासी) मरिआई ( इतर हिंदु देवदेवता ) |
| ष. शबरी भिल्ल | (आदिवासी) दंतेश्वरी माता, शंकर |
| स. कठपुतलीवाला | चावंड ( कुलदैवत .. जोतपूर ) |
| ह. स्मशान जोशी | महाभैरव, चामुंडा इ. |

( ए ) भटक्यांची वैशिष्ट्ये[34]

क. भूतकाळाविषयी प्रचंड अभिमान आढळतो.

ख. प्रत्येक जमातीत वेगळेपणा, श्रेष्ठत्वाची भावना, उच्चनीचतेचे तणाव आढळतात.

ग. अस्पृश्यता पाळतात.

घ. स्वजातीचा पारंपारिक पीळ आढळतो.

च. पारंपारिक जातपंचायतीचे अस्तित्व आहे. तिचेच कायदे पाळतात.

छ. पारंपारिक देवदेवता व श्रध्दा जपतात.

ज. तरूणमंडळी रूढी परंपरेस विरोध करतात पण फारसे यश नाही.

झ. आडनांवावरून जात जमात कळते, म्हणून काही भटके आडनांव अदलून वावरतात.

ट. जातपंचायतीचा कायदा मोडण्याचे धाडस करीत नाहीत.

ठ. जाती अंतर्गत नेतृत्वासाठी आपापसांत टोकाचा तणाव आढळतो.

ड. जाती जमातीतील समाज एकसंघ नसून गटागटात विखुरला आहे.

ढ. मुख्य जाती पोट जातीत बेटीव्यवहार होत नाही.

ण. सुधारलेले जमातवाले इतरांमध्ये मिसळत नाहीत.

त. कांही जमाती भटकण्यातच समाधान मानतात.

थ. पारंपारिक व्यवसाय सोडत नाहीत.

द. देवदेव्हारे उपासतापास अंधश्रध्दा जोपासतात.

ध. स्वतःची खास बोली / सांकेतिक भाषा टिकविण्यासाठी धडपड करतात.

न. काळाप्रमाणे बदलण्याची तयारी नाही.

प. जातीची खोटी प्रमाणपत्रे घेऊन सरकारी सवलत मिळविण्यासाठी कांही जमाती प्रयत्न करतात.

फ. पूर्वीची गुन्हेगारी प्रवृत्ती आजही काही प्रमाणात टिकून आहे.

ब. स्त्रियांना भटक्या जमातीत स्थान नाही. चूल व मूल या पलीकडे किंमत नाही

भ. एकाच जातीच्या लोकांना आपल्या इतर पोटजातींची माहिती नाही.

म. प्रस्थापित समाजाशी संपर्क ठेवण्यासाठी खास प्रयत्न करीत नाहीत.

य. स्वतःबद्दल अपराधी भावना व वेगळेपणात आनंद मानण्याची प्रवृत्ति आहे.

र. टोळयांनी फिरणारे भटके आहेत. तसेच एकेकटयाने फिरणारेही भटके आढळतात.

( ऐ ) <u>भटक्यांच्या आजच्या अडचणी</u>(35)

क. प्रस्थापित समाजात परकेपणाची भावना असल्याने आजही प्रस्थापित समाज व भटके यांच्यात सुसंवाद घडत नाही.

ख. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी नोंदविलेल्या गुन्हेगार जमातींकडे स्वातंत्र्योत्तर काळातही गुन्हेगार म्हणून पाहिले जाते.

ग. इतर समाज भटक्यांना सहजासहजी सामावून घेत नाहीत.

घ. सतत भटकंती व अस्थिर जीवनामुळे जातीचे दाखले मिळत नाहीत.

च. जाती दाखला नसल्यामुळे काही जमातींना बँका धंद्यासाठी कर्ज देत नाहीत.

छ. समाजातील शिक्षीत वर्ग त्यांच्यासाठी काही करीत नाही.

ज. समर्थ नेतृत्वाचा अभाव आहे.

झ. व्यवसायाचे आधुनिकीकरण व कारखानदारीमुळे पारंपारिक कुटीर उद्योगांना वाव नाही.

ट. स्वतःच्या मालकीची शेती नाही. नांव सांगायला गांव नाही. त्यामुळे कायमचा निवारा नाही. स्थिर जीवन नाही.

ठ.भटकंतीमुळे शिक्षण नाही, अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्रय आहे, यामुळे जमातीचा विकास होत नाही.

( ओ ) भटक्यांच्या पुनर्वसनासाठी झालेले प्रयत्न(36)

भटक्या जमाती व विमुक्त जमातींचे जीवन भटके असल्यामुळे त्यांच्यासाठी योजिलेल्या कल्याणकारी योजनांची फळे त्यांना मिळालेली नाहीत. यासाठी .......

क). जमिन देऊन त्यांना स्थायिक करणे.

ख). बिगरशेती व्यवसाय उपलब्ध करून देणे

या उपायांनी त्यांच्यात इष्ट बदल घडवून आणता येतील.

केन्द्र व राज्य शासन, सामाजिक संघटना, आदिम जाती सेवक संघ, पर्वतीय आदिम जाती सेवक संघ, सर्वोदयी संघटना, महाराष्ट्र भटक्या विमुक्त जातीसंघ इ. संस्था भटक्यांच्या कल्याणासाठी प्रयत्न करीत आहेत.

पंचवार्षिक योजनांमध्ये भटके व अर्ध भटके यांच्यासाठी कल्याणकारी कार्यक्रम राबविले असून भटक्यांचे पुनर्वसन करणे व प्रगत समाजजीवनाशी त्यांना निगडीत करणे या उद्देशाने प्रयत्न सुरू आहेत.

केन्द्र व महाराष्ट्र शासन पुरस्कृत योजना ... भटक्यांच्या उन्नतीसाठी एकूण तीन प्रकारच्या योजना राबविल्या आहेत.

अ.शैक्षणिक योजना ब.आर्थिक विकास योजना क.गृहनिर्माण व अन्य योजना.

(अ) सर्व स्तरावरील शिक्षणशुल्क, परीक्षा शुल्क, व माध्यमिक शिक्षणोत्तर शिष्यवृत्त्या, शासकीय, औद्योगिक प्रशिक्षण संस्थातील विद्यार्थ्यांना पाठयवेतन, तसेच वसतीगृहे, आश्रमशाळा व बालवाडया सुरू करणे इ. योजना शैक्षणिक योजनांत समाविष्ट आहेत.

(ब) जमीन बांधाबंदिस्ती, जमीनीचे समतलनीकरण तसेच सिंचन विहीरींचे बांधकाम, जुन्या सिंचन विहिरींची दुरुस्ती, शेतीच्या अवजारांची खरेदी, विहिरीवर विजेचे व तेलाचे पंप बसविणे, वगैरेसाठी अनुदान व कर्जपुरवठा यांचा आर्थिक विकास योजनेत समावेश आहे.

(क) सहकारी गृहनिर्माण संस्था व वैयक्तिक घरबांधणीसाठी कर्ज व अनुदान, पिण्याच्या पाण्याची सोय, मागासवर्गीय वस्त्यात रस्तेबांधणी आणि विजेचे दिवे बसविणे इ. योजनांचा तिस-या वर्गात समावेश आहे.

माध्यमिक शिक्षणोत्तर शिष्यवृत्तीवर केंद्र शासन खर्च करते. महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, व भटक्या विमुक्त जाती जमाती यांच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्याच्या 1981/82 च्या अर्थसंकल्पांत सुमारे 82 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

अशा प्रयत्नांची गरज प्रामुख्याने भटक्यांचे भटकेपण नष्ट व्हावे, त्यांना सुस्थिर जीवन जगता याचे यासाठी आहे. यासाठी खालील उपाय सुचविण्यात आले आहेत....

क. कायमच्या वास्तव्यासाठी भटक्यांना जमिनी देणे.

ख. .त्यांच्याजवळ असणा-या गुरांना चरण्यासाठी गवती कुरणे उपलब्ध करून देणे.

ग. दुग्ध व्यावसायिकांचे सहकारी संघ स्थापन करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे.

घ. त्यांच्या मेंढपाळ व्यवसायास प्रोत्साहन देणे.

च. घरे बांधण्यासाठी त्यांना पुरेशी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे.

छ. वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे.

ज. त्यांच्यातील जे धडधाकट असतील त्यांना सैनिकी सेवेत दाखल करणे.

झ. भटक्या आणि विमुक्त जातींच्या जनगणनेच्या वेळी विस्तृत नोंदी करणे.

ट. त्यांच्या कल्याणकारी योजनांना पुरेसा आर्थिक निधी वेळोवेळी उपलब्ध करून देणे.

ठ. त्यांच्यासाठी कार्य करणा-या सामाजिक संघटनाना / सेवाभावी संस्थांना कार्यक्षेत्र विस्तृत करण्यास आवश्यक ती मदत शासनाने करणे.

ड. व्यवसाय प्रशिक्षण देणारी केंद्रे मोठया संख्येने स्थापन करणे.

ढ. भटक्यांच्या प्रश्नासंबंधी अधिका-यांचा दृष्टीकोन सहानुभूतीपूर्वक असणे आवश्यक आहे.

( औ ) <u>भटक्यांच्यात झालेले बदल</u>[37]

क. उपजीविकेसाठी भटकंतीचे प्रमाण कमी होत आहे.

ख. शहराच्या आश्रयाने वस्ती करून रहात आहेत.

ग. शिक्षणाचा प्रसार होतो आहे.

घ. राजकारण व समाजकारणात प्रतिनिधित्व मिळाल्याने तरूण वर्ग त्यात रस घेत आहे.

च. समाजसुधारणेसाठी सामाजिक संघटनेची प्रवृत्ती वाढत आहे.

BARR. BAL... KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

छ. सामाजिक संस्था व जनजागृतीचे प्रमाण वाढत आहे.

ज. सरकारी नोकरीत काहीना सहभाग मिळतो आहे.

झ. खाजगी व्यवसाय करण्याकडे कांहींचा कल आहे.

ट. भटक्यांच्या गृहरचना सोसायटया निर्माण होत आहेत

ठ. तरूण पिढी परिवर्तनाच्या दिशेने प्रयत्न करीत आहे.

ड. अन्याय अत्याचाराची जाणीव व त्याविरूध्द संघर्ष करण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

ढ. राहणीमान, आवडी निवडी बदलत आहेत. शहरी समाजाचे अनुकरण करण्याकडे प्रयत्न करीत आहेत.

ण. अल्पप्रमाणात का होईना शिक्षित लोक सरकारी सवलतींचा फायदा घेत आहेत.

त. आंतरजातीय विवाह घडून येत आहेत.

थ. भटक्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव होत आहे. आपल्या हक्का विषयी ते जागृत होत आहेत.

************

<u>संदर्भ</u>.......


1. (प्रमुख संपादक) तर्कतीर्थ श्री जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश खंड 12, पृ.क्र. 19.
2. कित्ता पृ.क्र. 19.
3. (Edited by) Agarwal P.N. - Nalanda Concise Dictionary - Page No.652.
4. (Edited by) - Allen R.E.- The Pocket Oxford Dictionary of Current English.Page No.497.
5. संपादक .. तर्कतीर्थ श्री जोशी लक्ष्मणशास्त्री, उपरिनिर्दिष्ट पृ.क्र.19
6. कित्ता पृ.क्र. 19
7. कित्ता पृ.क्र. 19
8. कित्ता पृ.क्र.19
9. कित्ता पृ.क्र.19
10. कित्ता पृ.क्र.19
11. कित्ता पृ.क्र.19
12. कित्ता पृ.क्र.19
13. डॉ. मांडे प्रभाकर .. गावगाडयाबाहेर .. प्रस्तावना
14. इन्सायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस .. भाग (11-12) पृ.क्र.390-392
15. डॉ. मांडे प्रभाकर .. उपरिनिर्दिष्ट .. प्रस्तावना
16. कित्ता .. प्रस्तावना
17. कित्ता .. प्रस्तावना
18. संपादक .. तर्कतीर्थ श्री जोशी लक्ष्मणशास्त्री, उपरिनिर्दिष्ट पा.नं.20
19. कित्ता पा.नं. 20
20. कित्ता पा.नं. 20
21. कित्ता पा.नं. 20
22. कित्ता पा.नं. 20
23. कित्ता पा.नं. 20
24. कित्ता पा.नं. 20

25. कित्ता पा.नं. 20

26. कित्ता पा.नं. 21

27. चव्हाण रामनाथ .. भटक्या विमुक्तांचे अंतरंग .. पृ.क्र.7

28. डॉ. मांडे प्रभाकर .. उपरिनिर्दिष्ट .. प्रस्तावना

29. महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक, क्रीडा व पर्यटन विभाग परिपत्रक क्र. सीबीसी.1684 जो प. 592, 1999, बीसीडब्ल्यू.5 मंत्रालय,मुंबई 16 फेब्रु.1986.

30. चव्हाण रामनाथ .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 7 - 8

31. कित्ता पृ.क्र. 144 परिशिष्ट क्र.4.

32. कित्ता पृ.क्र. 115, परिशिष्ट नं.5

33. कित्ता पृ.क्र. 112, परिशिष्ट नं.3

34. कित्ता पृ.क्र.9

35. कित्ता पृ.क्र.10

36. संपादक .. श्री जोशी लक्ष्मणशास्त्री .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 21

37. चव्हाण रामनाथ .. उपरिनिर्दिष्ट पृ.क्र. 11

xxxxxxxxxxx